International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 8.141
Peer Reviewed Bi-Monthly
Vol. 7 No. 2 January – February - 2026

# भारताची लोकसंख्या रचना आणि बदलते प्रवाह: संयुक्त राष्ट्रांच्या लोकसंख्याविषयक अहवालावर (2025) आधारित संशोधन

**प्रा. गौरव दीपक काटकर[1] व प्रा. सचिन कांतीलाल रजपूत[2]**

*[1]सहा. प्राध्यापक, भूगोल विभाग शहाजी छ. महाविद्यालय, कोल्हापूर*

*[2]यशवंतराव चव्हाण वारणा महाविद्यालय, श्री वारणा नगर*

*Corresponding Author – प्रा. गौरव दीपक काटकर*

**DOI - 10.5281/zenodo.18491145**

**सार (Abstract):**

*संयुक्त राष्ट्र संघटनेच्या (United Nations) 2025 च्या लोकसंख्या अहवालानुसार भारत हा जगातील सर्वाधिक लोकसंख्या असलेला देश ठरला आहे. 2025 मध्ये भारताची लोकसंख्या सुमारे 1.46 अब्ज इतकी असल्याचा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे. या अहवालात भारताच्या लोकसंख्येतील वाढीचा वेग कमी होत चालल्याचे एकूण प्रजनन दर (Total Fertility Rate – TFR) replacement level पेक्षा खाली आल्याचे, आयुर्मर्यादा वाढत असल्याचे आणि वृद्ध लोकसंख्येचे प्रमाण भविष्यात लक्षणीय वाढणार असल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे. प्रस्तुत संशोधन निबंधात UN Population Report 2025 च्या आधारे भारतातील लोकसंख्यात्मक स्थिती, राज्यनिहाय जन्मदरातील फरक, लोकसंख्येतील बदलांचे सामाजिक-आर्थिक परिणाम आणि भविष्यातील आव्हाने यांचे सखोल विश्लेषण करण्यात आले आहे. दुय्यम माहितीवर आधारित वर्णनात्मक व विश्लेषणात्मक पद्धतीचा वापर करून हा अभ्यास करण्यात आला असून शेवटी धोरणात्मक सूचना मांडण्यात आल्या आहेत.*

**प्रस्तावना (Introduction):**

लोकसंख्या हा कोणत्याही राष्ट्राच्या विकासाचा अत्यंत महत्त्वाचा घटक असतो. लोकसंख्येची संख्या, रचना, वितरण आणि वाढीचा वेग यावर देशाची आर्थिक प्रगती, रोजगारनिर्मिती, आरोग्य व्यवस्था, शिक्षण व्यवस्था आणि सामाजिक स्थैर्य अवलंबून असते. भारत हा दीर्घकाळ जगातील दुसऱ्या क्रमांकाचा लोकसंख्या असलेला देश होता; मात्र संयुक्त राष्ट्रांच्या अलीकडील अहवालानुसार 2023 नंतर भारताने चीनला मागे टाकत पहिला क्रमांक मिळवला आहे.

UN Population Report 2025 नुसार भारताची लोकसंख्या वाढीचा वेग कमी होत असून देश लोकसंख्यात्मक संक्रमणाच्या (Demographic Transition) निर्णायक टप्प्यावर उभा आहे. जन्मदर घटत आहे, मृत्यूदर कमी झाला आहे, आयुर्मर्यादा वाढत आहे आणि परिणामी वृद्ध लोकसंख्या वाढण्याची चिन्हे दिसत आहेत. एकीकडे भारताकडे मोठी कार्यक्षम वयोगटातील लोकसंख्या आहे, तर दुसरीकडे भविष्यात वृद्धत्व, आरोग्यसेवा आणि सामाजिक सुरक्षा यांसारखी आव्हाने उभी राहणार आहेत. या पार्श्वभूमीवर UN Population Report 2025 चा अभ्यास करणे अत्यंत आवश्यक ठरते.

**साहित्य समीक्षा (Literature Review):**

लोकसंख्याशास्त्रावर आधारित अनेक राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय अभ्यास भारताच्या लोकसंख्यात्मक बदलांवर प्रकाश टाकतात. संयुक्त राष्ट्रांची World Population Prospects ही मालिका जागतिक व देशनिहाय लोकसंख्येचे सर्वात विश्वसनीय स्रोत मानली जाते. या अहवालांमध्ये लोकसंख्येचा आकार, जन्मदर, मृत्यूदर, आयुर्मर्यादा आणि भावी अंदाज दिलेले असतात.

UNFPA – State of World Population Report 2025 मध्ये जागतिक स्तरावर घटणाऱ्या प्रजनन दरांचा आढावा घेत भारताचा TFR 1.9 असल्याचे नमूद केले आहे. या अहवालात प्रजनन स्वातंत्र्य, महिलांचे शिक्षण व आरोग्य यांचा लोकसंख्येवर होणारा परिणाम अधोरेखित केला आहे.

भारतातील NFHS (National Family Health Survey) आणि Sample Registration System (SRS) अहवालांमधून राज्यनिहाय जन्मदर, मृत्यूदर व आरोग्य निर्देशकांची सविस्तर माहिती मिळते. Dyson, Visaria, Bhat यांसारख्या जनसंख्याशास्त्रज्ञांनी भारतातील उत्तर-दक्षिण लोकसंख्यात्मक दरी स्पष्ट केली आहे. या सर्व साहित्याचा आढावा घेतल्यास असे दिसते की भारत  कमी जन्मदर असलेल्या देशांच्या श्रेणीकडे वाटचाल करत आहे.

**संशोधनाची उद्दिष्टे (Objectives):**

1. UN Population Report 2025 *नुसार भारताची लोकसंख्यात्मक स्थिती अभ्यासणे.*
2. *भारतातील एकूण प्रजनन दर (*TFR) *व राज्यनिहाय जन्मदरातील फरकांचे विश्लेषण करणे.*
3. *भारताच्या भावी लोकसंख्येच्या अंदाजांचा अभ्यास करणे.*
4. *लोकसंख्या व्यवस्थापनासाठी आवश्यक धोरणात्मक सूचना सुचवणे.*

**संशोधन पद्धती (Research Methodology):**

या संशोधनासाठी वर्णनात्मक व विश्लेषणात्मक पद्धतीचा वापर करण्यात आला आहे. प्रस्तुत शोधनिबंधामध्ये भारताच्या लोकसंख्येचा कालसापेक्ष अभ्यास केला असून या संशोधनासाठी लागणारी जी आकडेवारी आहे ती United Nation Population Report 2025 मधील घेतली असून या संशोधनासाठी भारत सरकारच्या मिनिस्ट्री ऑफ हेल्थ अँड फॅमिली वेलीफेयर च्या संकेतस्थळावरून इतर आकडेवारी व माहिती घेतलेली आहे. प्रस्तुत दुय्यम प्रकारच्या आकडेवारीचे सांख्यिकी आकडेमोड करून त्यांचे विश्लेषण, पृथक्करण करून आलेखिय पद्धतीने दाखवले आहे. प्रस्तुत संशोधनासाठी 1961 ते 2025 या वर्षातील जन्मदराची दुय्यम प्रकारची आकडेवारी घेण्यात आलेली आहे.

**माहिती विश्लेषण:**

**अ) भारताची लोकसंख्यात्मक स्थितीचा आढावा:**

UN Population Report 2025 नुसार भारताची लोकसंख्या सुमारे 1.46 अब्ज (146 कोटी) आहे. लोकसंख्या वाढीचा दर कमी झाला असला तरी एकूण संख्या अजूनही वाढत आहे. भारताकडे जगातील सर्वात मोठी कार्यक्षम वयोगटातील लोकसंख्या आहे. एकूण प्रजनन दर (TFR) भारताचा TFR सुमारे 1.9 आहे, जो replacement level (2.1) पेक्षा कमी आहे. याचा अर्थ दीर्घकालीन दृष्टिकोनातून भारताची लोकसंख्या स्थिर होऊन पुढे घटण्याची शक्यता आहे. भारतामध्ये जन्मदरात मोठी प्रादेशिक विषमता दिसून येते काही राज्यांचा जन्मदर हा

उच्च असल्याचे दिसून येते त्यामध्ये बिहार (TFR 3.0) उत्तर प्रदेश (2.4) झारखंड (2.3) मेघालय (2.9) या राज्यांमध्ये शिक्षणाची पातळी कमी, ग्रामीण लोकसंख्या जास्त आणि पारंपरिक कुटुंबव्यवस्था प्रबळ असल्यामुळे जन्मदर तुलनेने जास्त आहे.

बिहार, उत्तर प्रदेश, झारखंड आणि मेघालय या राज्यांमध्ये जन्मदर तुलनेने जास्त आढळतो. यामागे सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक व भौगोलिक कारणांचा एकत्रित प्रभाव दिसून येतो. या राज्यांमध्ये शिक्षणाचा स्तर तुलनेने कमी, विशेषतः स्त्रीशिक्षणाचा अभाव जाणवतो. शिक्षणाच्या कमतरतेमुळे कुटुंब नियोजनाबाबतची जाणीव कमी राहते व लवकर विवाह होण्याचे प्रमाण जास्त असते. परिणामी प्रजनन कालावधी वाढून जन्मदर अधिक राहतो. गरीबी व आर्थिक असुरक्षितता. ग्रामीण व आदिवासी भागांत मुलांना भविष्यातील आर्थिक आधार व श्रमशक्ती म्हणून पाहिले जाते त्यामुळे मोठ्या कुटुंबाची प्रवृत्ती आढळते.

कुटुंब नियोजन कार्यक्रमांची मर्यादित अंमलबजावणी. आरोग्य सुविधा दुर्गम भागांत कमी विकसित असल्याने गर्भनिरोधक साधनांचा वापर कमी होतो.तसेच म्हणजे सामाजिक व सांस्कृतिक परंपरा,पुत्रप्राप्तीची इच्छा,धार्मिक समजुती आणि पारंपरिक कुटुंबरचना यांमुळे अपत्यसंख्या वाढते.

मेघालयसारख्या राज्यात काही भागांत मातृसत्ताक समाजव्यवस्था असूनही ग्रामीणता व मर्यादित आरोग्य सुविधा यांमुळे जन्मदर तुलनेने जास्त राहतो. याशिवाय, बालमृत्यू दर तुलनेने अधिक असल्यामुळे ‘अधिक मुले’ जन्माला घालण्याची मानसिकता निर्माण होते. एकूणच, विकासाचा वेग मंद, शिक्षणाचा अभाव व सामाजिक परंपरा ही या राज्यांतील जास्त जन्मदराची मुख्य कारणे मानली जातात.

**ब) कमी जन्मदर असलेली राज्ये:**


केरळ (1.8), तामिळनाडू (1.8), महाराष्ट्र (1.7), कर्नाटक (1.7), गोवा (1.3) आणि सिक्कीम (1.1) या राज्यांमध्ये जन्मदर तुलनेने कमी आढळतो. यामागे सामाजिक, आर्थिक व सांस्कृतिक कारणांचा संयुक्त परिणाम दिसून येतो.या राज्यांमध्ये शिक्षणाचा स्तर विशेषतः स्त्रीशिक्षण जास्त आहे. शिक्षित महिलांमध्ये विवाहाचे वय वाढते, कुटुंब नियोजनाबाबत जागरूकता असते आणि अपत्यसंख्येवर मर्यादा ठेवण्याची प्रवृत्ती दिसते. शहरीकरण आणि औद्योगिकीकरणाचा प्रभाव अधिक आहे. शहरी जीवनशैलीत मुलांचे संगोपन खर्चिक ठरते, त्यामुळे लहान कुटुंबाचा स्वीकार केला जातो.

आरोग्य सुविधा व कुटुंब नियोजन कार्यक्रमांची प्रभावी अंमलबजावणी यामुळे राज्यांमध्ये गर्भनिरोधक साधनांचा वापर जास्त असून माता व बालमृत्यू दर कमी आहे. त्यामुळे ‘अधिक मुले’ ही गरज उरत नाही. महिलांचा रोजगारातील वाढता सहभाग, नोकरी करणाऱ्या महिलांमध्ये उशिरा मातृत्व व कमी अपत्यसंख्या दिसून येते. याशिवाय, सामाजिक बदल, वाढती जीवनशैलीची अपेक्षा आणि वैयक्तिक स्वातंत्र्याची जाणीव यांमुळेही जन्मदर कमी झाला आहे. एकूणच, विकासाचे निर्देशांक सुधारल्यामुळे या राज्यांमध्ये लोकसंख्या वाढीचा वेग मंदावलेला दिसतो.या राज्यांमध्ये महिला शिक्षण, शहरीकरण, आरोग्य सुविधा आणि कुटुंब नियोजन यशस्वी ठरले आहे.

**सारणी क्र. 1: भारत: 1961 ते 2025 जन्मदर**

| वर्ष | प्रजनन दर (%) | वर्ष | प्रजनन दर (%) |
|---|---|---|---|
| 1961 | 5.94 | 2001 | 3.35 |
| 1971 | 5.62 | 2011 | 2.6 |
| 1981 | 4.78 | 2021 | *2.014 |
| 1991 | 4.05 | 2025 | *2.1 |

(**स्त्रोत**: जनगणना अहवाल 1961 ते 2011) (*प्रक्षेपित जन्मदर)




**आकृती क्र. 1**

**क) भारतातील प्रजनन दरातील बदल : 1961–2025**

1961 मध्ये भारताचा प्रजनन दर 5.94% इतका उच्च होता, जो त्या काळातील ग्रामीण समाजरचना व कुटुंबप्रधान जीवनपद्धतीचे प्रतीक होता. 1971 मध्ये हा दर किंचित घटून 5.62 % झाला. 1981 मध्ये कुटुंब नियोजन कार्यक्रमांचा प्रभाव वाढल्याने प्रजनन दर 4.78 टक्क्यांपर्यंत खाली आला. 1991 मध्ये शिक्षण, विशेषतः महिला शिक्षणाचा विस्तार झाल्यामुळे हा दर 4.05 % झाला. 2001 मध्ये शहरीकरण, औद्योगिकीकरण आणि आरोग्य सुविधांतील सुधारणांमुळे प्रजनन दर 3.35 टक्क्यांवर आला. 2011 मध्ये हा दर आणखी घटून 2.6% झाला. 2021 मध्ये भारताचा प्रजनन दर 2.014 टक्के इतका असून तो पुनर्स्थापन स्तराच्या (2.1) अगदी जवळ आहे.


2025 साठी अंदाजित प्रजनन दर 2.1 टक्के दर्शवण्यात आला आहे. या कालावधीत लोकसंख्या वाढीचा वेग लक्षणीयरीत्या कमी झाल्याचे दिसून येते. महिला साक्षरतेत वाढ, विवाहाचे वाढते वय आणि कुटुंब नियोजनाची जाणीव ही घट होण्याची प्रमुख कारणे आहेत. बालमृत्यू दरात झालेली घट हीसुद्धा एक महत्त्वाची बाब ठरली आहे. प्रजनन दरातील घट ही आर्थिक

विकासासाठी उपयुक्त मानली जाते. तथापि, भविष्यात वृद्ध लोकसंख्येचे प्रमाण वाढण्याची शक्यता आहे. कामगार वर्गातील घट आणि सामाजिक सुरक्षा व्यवस्थेवरील ताण ही संभाव्य आव्हाने असू शकतात. म्हणूनच, लोकसंख्या स्थिरीकरणासोबत संतुलित सामाजिक-आर्थिक धोरणांची आवश्यकता आहे.

**सारणी क्र. 2: भारत: राज्यानुसार अपेक्षित व सध्य स्थितीत असलेला प्रजनन दर**

| राज्य | अपेक्षित प्रजनन दर | सध्य स्थितीत असलेला प्रजनन दर | राज्य | अपेक्षित प्रजनन दर | सध्य स्थितीत असलेला प्रजनन दर |
|---|---|---|---|---|---|
| सिक्किम | 0.9 | 1 | पडूचेरी | 1.3 | 1.5 |
| गोवा | 1.2 | 1.3 | पंजाब | 1.3 | 1.6 |
| अंदमान निकोबर | 1.1 | 1.3 | दिल्ही | 1.3 | 1.6 |
| लढाख | 1.1 | 1.3 | पश्चिम बंगाल | 1.4 | 1.6 |
| जम्मू कश्मीर | 1.1 | 1.3 | हिमाचल प्रदेश | 1.4 | 1.7 |
| चंदिगढ | 1.2 | 1.4 | नागालँड | 1.6 | 1.7 |
| लक्ष्यद्वीप | 1.2 | 1.4 | त्रिपुरा | 1.5 | 1.7 |
| पडूचेरी | 1.3 | 1.5 | तेलंगणा | 1.6 | 1.7 |
| पंजाब | 1.3 | 1.6 | उत्तराखंड | 1.5 | 1.8 |
| दिल्ही | 1.3 | 1.6 | अरुणाचल प्रदेश | 1.5 | 1.8 |
| पश्चिम बंगाल | 1.4 | 1.6 | ओदिशा | 1.5 | 1.8 |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| हिमाचल प्रदेश | 1.4 | 1.7 | छत्तीसगढ | 1.6 | 1.8 |
| नागालँड | 1.6 | 1.7 | दादरा नगर हवेली | 1.6 | 1.8 |
| त्रिपुरा | 1.5 | 1.7 | केरळ | 1.7 | 1.8 |
| महाराष्ट्र | 1.4 | 1.7 | तमिळनाडू | 1.6 | 1.8 |
| आंध्रा प्रदेश | 1.6 | 1.7 | हरियाणा | 1.5 | 1.9 |
| कर्नाटक | 1.4 | 1.7 | माणिपूर | 2 | 2.2 |
| मिजोराम | 1.8 | 1.9 | उत्तरप्रदेश | 1.8 | 2.3 |
| आसाम | 1.6 | 1.9 | झारखंड | 1.9 | 2.3 |
| गुजरात | 1.5 | 1.9 | मध्यप्रदेश | 1.6 | 2 |
| राजस्थान | 1.6 | 2 | | | |




**आकृती क्र. 2 (स्त्रोत: संयुक्त राष्ट्र लोकसंख्या अहवाल 2025)**

**ड) राज्यनिहाय अपेक्षित व सध्य प्रजनन दर:**

प्रजनन दर (Total Fertility Rate – TFR) हा लोकसंख्या वाढीचा महत्त्वाचा निर्देशांक आहे. 2.1 हा प्रतिस्थापन स्तर (Replacement Level) मानला जातो. दिलेल्या तक्त्यात भारतातील विविध राज्ये व केंद्रशासित प्रदेशांचा अपेक्षित प्रजनन दर आणि सध्य स्थितीत असलेला प्रजनन दर दर्शविला आहे.

1) कमी प्रजनन दर असलेली राज्ये (TFR < 1.5)

सिक्किम, गोवा, चंदिगढ, लक्ष्यद्वीप, पुडुचेरी, पश्चिम बंगाल, महाराष्ट्र, कर्नाटक, आंध्र प्रदेश, तेलंगणा, केरळ, तमिळनाडू इ. या राज्यांमध्ये शिक्षण, शहरीकरण, आरोग्य सुविधा, महिलांचा रोजगार यांचा प्रभाव दिसून येतो. त्यामुळे भविष्यात वृद्ध लोकसंख्येचे प्रमाण वाढण्याची शक्यता आहे.

2) मध्यम प्रजनन दर असलेली राज्ये (TFR 1.5 ते 2.1)

हिमाचल प्रदेश, हरियाणा, गुजरात, ओदिशा, छत्तीसगढ, राजस्थान, मध्यप्रदेश, उत्तराखंड इ. ही राज्ये लोकसंख्या संक्रमणाच्या मध्य टप्प्यात आहेत. त्यामुळे योग्य धोरणांमुळे प्रतिस्थापन स्तर स्थिर प्रजनन दर ठेवणे शक्य.

3) उच्च प्रजनन दर असलेली राज्ये (TFR > 2.1)

बिहार, उत्तर प्रदेश, झारखंड, मेघालय, मणिपूर, आसाम या राज्यात कमी साक्षरता, ग्रामीण लोकसंख्या, गरीबी, आरोग्य व कुटुंब नियोजन सेवांची मर्यादा या प्रमुख कारणांमुळे लोकसंख्या वाढीचा दबाव अधिक आहे.

4) अपेक्षित व सध्य प्रजनन दरातील फरक

बहुतांश राज्यांमध्ये सध्याचा प्रजनन दर हा अपेक्षित दरापेक्षा अधिक आहे. याचा अर्थ लोकसंख्या नियंत्रणासाठी अजूनही प्रयत्नांची गरज आहे.

**सारांश :**

भारतामध्ये प्रजनन दरात प्रदेशानुसार मोठी असमानता आढळते. दक्षिण व काही पश्चिम राज्ये कमी प्रजनन दराकडे वाटचाल करत आहेत तर उत्तर व पूर्व

भारतातील काही राज्यांमध्ये प्रजनन दर अजूनही जास्त आहे. त्यामुळे राज्यनिहाय लोकसंख्या धोरणे, शिक्षणवृद्धी, महिलांचे सक्षमीकरण व प्रभावी कुटुंब नियोजन कार्यक्रम राबविणे आवश्यक आहे.

**इ) भारताच्या भविष्यातील लोकसंख्येचा अंदाज:**


भारताच्या भविष्यातील लोकसंख्येच्या अंदाजाचा अभ्यास या अहवालात करण्यात आलेला आहे. त्यातील निष्कर्ष पुढीलप्रमाणे सांगता येतील, संयुक्त राष्ट्राच्या World Population Prospects 2024/2025 अहवालानुसार भारताच्या 2060 पर्यंतच्या लोकसंख्या अंदाजाची सविस्तर माहिती पुढील प्रमाणे सांगता येईल. 2025 मध्ये भारताची लोकसंख्या सुमारे 1.46 अब्ज (146 कोटी) आहे आणि भारत आता जगातील सर्वात जास्त लोकसंख्या असलेला देश आहे. भारताची लोकसंख्या पुढील दशकांत वाढत राहील कारण जन्मदर अजूनही कमी झाला असला तरी वयाच्या संरचनेमुळे वाढ सुरू राहते. अहवालानुसार भारताची लोकसंख्या 2054 पर्यंत जवळपास 1.69–1.70 अब्ज (169–170 कोटी) पर्यंत वाढेल.

सुमारे 2060 च्या आसपास लोकसंख्या वृद्धीचा शिखर (peak) गाठेल म्हणजेच सुमारे 1.7 अब्ज (170 कोटी) लोकसंख्येचा आकडा शक्य आहे. 2060 नंतर लोकसंख्या वाढ न थांबता लोकसंख्या वाढीचा वेग हा कमी होत जाईल. कारण जन्मदर घटत चालला आहे. (TFR सध्या 1.9 प्रतिस्थापन पातळीपेक्षा कमी) अहवालानुसार 2060 नंतर भारताची लोकसंख्या हळूहळू कमी होईल आणि 2100 पर्यंत सुमारे 1.5 अब्ज (150 कोटी) पर्यंत खाली येऊ शकते. या सर्व आकडेवारीचा विचार करता काही निष्कर्ष निघू शकतात ते म्हणजे जन्मदर कमी होणे आणि वृद्ध लोकसंख्येचा हिस्सा वाढणे हे भारतासमोर मोठे धोरणात्मक आव्हान बनू शकते. तरुण लोकसंख्या (कार्यशील वयोगट) अजून काही काळ वाढत राहील, ज्यामुळे लोकसंख्येचा लाभांश मिळण्याची संधी आहे पण त्यासाठी रोजगार, आरोग्य, शिक्षण यासारख्या क्षेत्रांमध्ये योजना व त्याची प्रभावी अंलबजावणी करणे आवश्यक आहे.

वरील सर्व आकडेवारीचा विचार करता एकूणच भारताचा जन्मदर कमी होत आहे. या जन्मदर कमी होण्यापाठीमागचा विचार केल्यास पुढील काही कारणे सर्वेक्षणातून पुढे आलेली आहेत. लिंग असमानता, बदलते नातेसंबंध, भविष्याविषयी अनिश्चितता, योग्य जोडीदाराचा अभाव, काळजी घेण्याचे असमान ओझे इ.

**जन्मदर कमी होण्याची प्रमुख कारणे:**

| कारणे | टक्केवारी |
|---|---|
| पालकत्वाचा प्रचंड खर्च | 40% |
| घरांची अडचण | 22% |
| नोकरीमधील असुरक्षितता | 21% |
| बालसंगोपनाच्या योग्य सोयीसुविधांचा अभाव | 18% |
| आरोग्याच्या समस्या | 15% |
| गर्भधारणेसाठी योग्य सोयीसुविधांची अनुपलब्धता | 14% |
| वंध्यत्व | 13% |




**(स्त्रोत: संयुक्त राष्ट्र लोकसंख्या निधीच्या सहकार्याने भारतासह अनेक देशांमध्ये 14000 लोकांचा समावेश असलेल्या ऑनलाइन सेवेद्वारे (You Gov) केलेल्या सर्वेक्षणातून मिळालेले निष्कर्ष)**

भारताची लोकसंख्या 2060 च्या दशकात 1.7 अब्ज होईल. आणि त्यानंतर ती कमी होईल. संयुक्त राष्ट्राच्या मते कमी लोकसंख्या किंवा जास्त लोकसंख्या हे संकट नाही तर घटता प्रजनन दर हे खरं संकट आहे. त्यामुळे एका कालावधीनंतर लोकसंख्येतील तरुण कार्यशील लोकसंख्या घटते.

**निष्कर्ष (Findings):**

1. भारत 2025 मध्ये जगातील सर्वाधिक लोकसंख्या असलेला देश आहे.
2. देशाचा प्रजनन दर अपेक्षित प्रजनन दारपेक्षा खाली आला आहे.
3. राज्यनिहाय जन्मदरात मोठी विषमता आहे.
4. भारत लोकसंख्यात्मक संक्रमणाच्या निर्णायक टप्प्यावर आहे.
5. वृद्ध लोकसंख्येचे प्रमाण भविष्यात वाढू शकते.
6. कार्यक्षम वयोगटातील लोकसंख्या ही भारतासाठी मोठी संधी आहे.
7. लोकसंख्या वाढीचा वेग कमी झाल्यामुळे दीर्घकालीन धोरणांची गरज आहे.

**सूचना (Suggestions):**

1. उच्च जन्मदर असलेल्या राज्यांमध्ये शिक्षण व कुटुंब नियोजन कार्यक्रम अधिक प्रभावी करावेत.
2. महिलांचे शिक्षण व रोजगार संधी वाढवाव्यात.
3. वृद्ध लोकसंख्येसाठी आरोग्य व सामाजिक सुरक्षा योजना बळकट कराव्यात.
4. शहरीकरण नियोजनबद्ध पद्धतीने करावे.
5. कौशल्य विकास व रोजगारनिर्मितीवर भर द्यावा.
6. जनगणना व लोकसंख्या सर्वेक्षण वेळेवर करावेत.

**संदर्भसूची (References):**

1. भारत सरकार, सांख्यिकी व कार्यक्रम अंमलबजावणी मंत्रालय.भारताची लोकसंख्याशास्त्रीय रूपरेषा. नवी दिल्ली.
2. World Population Prospects 2024/2025. New York: United Nations.
3. UNFPA (United Nations Population Fund). State of World Population Report 2025: The Real Fertility Crisis. New York: UNFPA.
4. Government of India, Ministry of Health and Family Welfare. National Family Health Survey (NFHS-5), 2019–21. New Delhi.
5. Registrar General of India: Sample Registration System (SRS) Statistical Report.
6. Planning Commission of India.: Population Stabilisation and Development. New Delhi: Government of India.
7. Bongaarts, J.(2009).“Human Population Growth and the Demographic Transition.” Philosophical Transactions of the Royal Society B, 364(1532), 2985–2990.